
NEHRU BAL PUSTAKALAYA

# असा जाहला स्वतंत्र भारत

कृष्ण चैतन्य

अनुवाद

सुनीता गाडगीळ



ISBN 81-237-3373-3


पहिली आवृत्ती : 1983 (*शके* 1905)
दुसरी संशोधित आवृत्ती : 1991 (*शके* 1913)
तिसरी आवृत्ती : 1992 (*शके* 1914)
चौथी आवृत्ती : 2000 (*शके* 1922)
मूळ © कृष्ण चैतन्य, 1973
मराठी अनुवाद : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1983
How India Won Her Freedom *(Marathi)*

**रु. 13.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5, ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110016 यांनी प्रकाशित केले.



नेहरू बाल पुस्तकालय



# असा जाहला स्वतंत्र भारत

लेखक
**कृष्ण चैतन्य**

अनुवाद
**सुनीता गाडगीळ**

चित्रे
**ज्योतिष दत्तगुप्ता**

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



पंधरा ऑगस्ट हा सुट्टीचा दिवस.
कां ? कारण हा आपला स्वातंत्र्य दिन आहे.
स्वातंत्र्य दिन म्हणजे काय ?
भारत स्वतंत्र झाला, तो दिवस.
१९४७ साली आपला भारत स्वतंत्र झाला.
१९४७ सालापूर्वी भारत स्वतंत्र का नव्हता ?

भारतीय जनतेचे स्वातंत्र्य ब्रिटिशांनी कसे लुटले आणि ते स्वातंत्र्य परत जिंकण्यासाठी अनेक वर्षे आणि अनेक मार्गांनी भारतीय जनता कशी लढली त्याची ही कथा आहे.

आपला संबंध इतिहास आपण पाहिला तर आपल्याला असे आढळते की जगातल्या अनेक भागांतले लोक व्यापाराच्या निमित्ताने आपल्या देशांत आले. आपल्या देशात उत्पादन होणाऱ्या अनेक गोष्टींना परदेशातून फार मोठी मागणी असे. विशेषत: आपल्या हातमागाच्या वस्तू व रेशीम हे तर फारच प्रसिद्ध. आपल्याकडे तयार होणारा सुती कपडा सुद्धा फार लोकप्रिय होता. भारतीय मसाले, उदा. :– काळी मिरी, वेलची यांना तर युरोपातून फार मोठी मागणी होती. 'फोनिसियन्स' लोकांनी प्रथम ह्या पदार्थांचा व्यापार हातात घेतला. हे लोक उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर राहात असत. पूर्वीच्या काळी ते सर्वात हुषार व्यापारी म्हणून ओळखले जात. पुढे ग्रीक, रोमन अरब या लोकांनी व्यापार चालू ठेवला.





परंतु ५०० वर्षापूर्वी ही परिस्थिती वदलली. युरोपीय देश वेगळया नवीन पद्धतीने विचार करू लागले. आपण वलवान–शक्तिमान आहोत आपल्याजवळ शस्त्रास्त्रे आहेत. आपल्याला पाहिजे ते आपण या जोरावर मिळवू शकू अशी त्यांची विचारसरणी झाली. मग परिस्थिती वदलली. 'आम्ही जर आफ्रिका आणि आशिया जिंकू शकतो, तर आम्हांला काय घेता येईल ते आम्ही घेऊ शकतो. आम्हाला त्यासाठी काही किंमत मोजावी लागत नाही. हजारो माणसे आमच्यासाठी राबतात, काम करतात' असे ते म्हणू लागले. हीच कल्पना मनात धरून प्रथम पोर्तुगीज लोकांनी भारतात प्रवेश केला. १४९८ साली त्यांचे पहिले जहाज कालिकतमध्ये प्रवेश करते झाले. कालिकतचा राजा झामोरिन याला प्रथम आनंद झाला. त्याची कल्पना झाली, नवीन देशातील व्यापारी व्यापारासाठी आपल्याकडे आले. जास्त व्यापार झाला म्हणजे लोकांचा जास्त फायदा, असे त्याला वाटले. परंतु दुर्दैवाने सर्व निराळेच घडले. पोर्तुगीजांना सर्व व्यापार स्वतःसाठी करायचा होता. भारतात येणारी दुसऱ्या देशातील व्यापारी जहाज वळकावून – बुडवून टाका असे ते सांगत. त्यावरील खलासी व व्यापारी यांना मारून टाका आणि माल हिसकावून घ्या, असा ते आदेश देत. त्यामुळे शेकडो वर्षे अरवांनी भारताशी मैत्रीने चालवलेला व्यापार बंद पडला. याचवेळी दक्षिण भारतातील पश्चिम किनाऱ्यावर छोटी छोटी राज्ये निर्माण झाली. पोर्तुगीजांनी त्यांच्यांत भांडणे लावून त्याला खतपाणी घातले. त्यांच्यात शत्रुत्व वाढवले. परंतु पोर्तुगीजांच्या मदतीने जे राजे जिंकले त्यांना नंतर असे आढळून आले की आपण पोर्तुगीजांचे गुलाम झालो आहोत. मीरी आणि अनेक गोष्टी जवरदस्तीने पोर्तुगीजांनी या लोकांकडून कमी किंमतीत विकत घेतल्या.





युरोपामधल्या इतर देशातील लोकानी जेव्हा पाहिले की पोर्तुगीज लोक हे अल्पावधीत श्रीमंत होत आहेत तेव्हा त्यांना पण असा वाममार्गाचा उपयोग करून श्रीमंत व्हावे असे वाटू लागले. मग डच व्यापारी आपली जहाजे घेऊन भारतात आले. नंतर फ्रेंच आले आणि सगळ्यात शेवटी ब्रिटिश आले. लोभी माणसांना भागीदारी करायला कधी आवडत नाही. त्यामुळे स्वाभाविकच ही लोभी परदेशी मंडळी आपापसात भांडू लागली. प्रत्येकाला वाटू लागले सर्व व्यापार आपल्याच ताब्यात असावा. पण शेवटी या भांडणात इंग्रज विजयी झाले.

जे इंग्लिश लोक भारतात आले, ते बहुतेक इस्ट इंडिया कंपनीतले होते आणि ती कंपनी बहुतेक व्यापारी लोकांचीच होती. व्यापारी आपल्या व्यापारासाठी म्हणून जवळ सैन्य बाळगत नसत. परंतु ईस्ट इंडिया कंपनीला जेव्हा सुरत, मद्रास, कलकत्ता, मुंबई अशा मोठ्या शहरांतून व्यापारासाठी गुदामे बांधायची परवानगी मिळाली तेव्हा त्यांनी गुदामे न बांधता तिथे किल्ले बांधले. सैन्य आणून ठेवले आणि प्रतिवर्षी सैनिकांची संख्या वाढू लागली.



बंगालचा नबाब सिराजउद्दौला याला मात्र शंका आली की परदेशांतून आलेल्या या व्यापाऱ्यांना सैन्य दारुगोळा जवळ बाळगण्याची काय जरूर? किल्ले बांधण्याची पण आवश्यकता नाही. त्याने कलकत्त्याच्या त्यांच्या किल्ल्यांतून बंदूका व दारुगोळा काढून घेण्याचा हुकूम दिला. परंतु व्यापाऱ्यांनी त्यास स्पष्ट नकार दिला. युद्धाची ठिणगी पडली. १७५७ च्या प्लासीला झालेल्या लढाईत नबाबाचा पराभव होऊन तो मारला गेला. लढाई सुरू होण्यापूर्वीच ब्रिटिशांनी नबाबाच्या सेनापतीला लाच देऊन फितूर करून घेतला होता. त्याने नबाबाला फसवले. त्यामुळे बक्षिसी म्हणून ब्रिटिशांनी त्या सेनापतीलाच त्या गादीवर बसवले. काही काळानंतर ब्रिटिशांना जेव्हा सेनापतीकडून सर्व मिळाले तेव्हा त्यांनी त्याचा काटा काढला. दुसऱ्याच माणसाला नबाब केले. या नवीन नबाबाने प्रथम त्यांच्या मर्जीप्रमाणे सर्व काही केले. काही काळानंतर त्यांच्या अधाशी वृत्तीचा आणि आपल्याला देण्यात येणाऱ्या अपमानस्पद वागणुकीचा इतका राग आला की दिल्लीच्या मोंगल बादशहाच्या मदतीने त्याने ब्रिटीशांशी लढा देण्याचे ठरवले. परंतु ब्रिटिश सैन्य हे फार बलवान होते. नबाबाचा यांत पराभव झाला.





नवावाच्या मदतीने बंगालचा कारभार पाहाण्याची त्यांनी मागणी केली. नवावाला मागणी मान्य करणे भाग पडले. त्याने बंगालची दिवाणी ब्रिटिशांना वहाल केली. याच मार्गाने हळूहळू ब्रिटिश व्यापारी भारताच्या लोकांवर हुकमत गाजवू लागले.

पुढील शंभर वर्षांत एकेक करून त्यांनी अनेक प्रदेशांवर तावा मिळविला. भारतातील प्रत्येक जातीजमातींतील लोकांना त्यांनी नागविले, नाडले. शेतकऱ्यांवर तर जवरदस्त कर वसविला अनेक वऱ्या वाईट मार्गाने अगणित संपत्ती गोळा केली. उदा. कपडे रंगविण्याची साधी नीळ ! त्या नीळीचा ब्रिटिशांखेरीज त्यांनी कोणालाही व्यापार करू दिला नाही. शेतकऱ्यांना जवरदस्तीने त्यांच्या शेतांतून फक्त नीळीचेच पीक काढायला लावले. वास्तविक शेतकऱ्यांना आपल्या उदर-निर्वाहासाठी गहू तांदूळ वगैरे सारखे गरजेचे पीक काढावयाचे होते. त्यांच्या शेतांतून काढलेली नीळ ब्रिटिशांनी ठरविलेल्या किंमतीलाच आपल्या व्यापाऱ्यांना त्यांनी विकायला लावली.

सुरतेतील सुती कापड वीणकर व बंगाल-मधील रेशमी कापड वीणकर यांनाही आपला उत्पादित माल ब्रिटिश व्यापाऱ्यानाच विकायला लावला. त्या मालाची किंमतही ईस्ट इंडिया कंपनीनेच ठरवली. या सर्व मालाची किंमत कंपनीचे लोक इतकी कमी देत की काही वेळा शेतकऱ्यांना व विणकऱ्यांना पोटासाठी आपला माल चोरून वाहेर इतर लोकांना विकावे लागे.



परंतु अशी विक्री करताना ते कधी सापडलेच तर त्यांची रवानगी तुरुंगात होई. गावातील लोकांनी आपला माल बाहेर इतरांना विकल्याचा जर ब्रिटिशांना सुगावा लागलाच तर ते सबंध गाव ब्रिटिश लोक पेटवून देत असत. ब्रिटिशांनी उभारलेल्या कारखान्यांतील मजूर देखील याहून फारसे सुखी नव्हते.

भारतातही संस्थानिक राजे महाराजे खूप चिडले होते, कारण ब्रिटिश सांगतील त्याप्रमाणेच त्यांनाही वागावे लागत होते. लॉर्ड डलहौसी कंपनीचा गव्हर्नर जनरल. याने तर असा एक फतवा काढला की भारतातील एखादा संस्थानिक जर निपुत्रिक किंवा मागे वारस न ठेवता मेला, तर ते संस्थान आपोआपच ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली यायला पाहिजे अशा तऱ्हेच्या अनेक वाममार्गांनी ब्रिटिशांनी अमाप संपत्ती व इतर मालमत्ता गोळा केली.



आपल्यापैकी काहीजणानी हातमाग पाहिला असेल, काहीजणांनी सूतगिरणी पाहिली असेल किंवा कमीतकमी त्याचे चित्र तरी पाहिले असेल. हातमागाची किंमत कमी असते. त्यावर आपल्याला कपडा जास्त उत्पन्न करता येत नाही. गिरणीत यंत्रावर काम चालत असल्यामुळे हातमागाच्या मानाने कापडाचे उत्पन्न अनेकपटीने निघते. परंतु त्यासाठी पैसा अधिक मोजावा लागतो. १७६० पर्यंत इंग्लंडमधेही छोट्या हातमागावर सूत काढणे, कापड विणणे चालायचे. पुढे जेम्स वॅटने वाफेच्या इंजिनाचा शोध लावला आणि माणसाला मोठमोठ्या गिरण्या आणि कारखाने त्यामुळे उभारता येऊ लागले. अनेक कामे यापैकी माणसाला हाताने करावी लागत होती. तीच कामे आता मशीनच्या सहाय्याने होऊ लागली. परंतु अशी मशीन्स तयार करणे किंवा कारखाने उभे करणे याला ब्रिटिशांना पैशाची जरुरी असे. ब्रिटिश सरकारजवळ किंवा त्यांच्या लोकांजवळ एवढा पैसा नव्हता. परंतु भारतातून खोऱ्याने जमा केलेली संपत्ती जेव्हा इंग्लंडला पाठवली तेव्हा ब्रिटिशांना कारखाने गिरण्या उभे करणे सहज शक्य झाले.

औद्योगिक क्रान्तीबद्दल तुम्ही ऐकले असेलच. औद्योगिक क्रान्ती म्हणजे पूर्वी जे लहान लहान यंत्राच्या सहाय्याने माल तयार करायचे ते आता मोठ्या यंत्राच्या सहाय्याने गिरण्या-कारखान्यातून प्रचंड प्रमाणावर माल तयार करू लागले. हा माल एवढा मोठ्या प्रमाणात तयार होऊ लागला, की तो विकत घेण्यासाठी लोकच कमी पडू लागले. ब्रिटिश लोक स्वतः तर आपल्या गिरण्यातून तयार झालेले कापड घेत होतेच तरीही माल शिल्लक राहायचा. हा शिल्लक राहिलेला माल किंवा कापड ह्या लोकांनी भारतात आणून इथल्या लोकांना विकायला सुरवात केली. ब्रिटिश व्यापाऱ्यांना याबाबतीत लागेल तितकी मदत त्यांच्या लोकांनी केली. वास्तविक भारतातील विणकरही आपल्या हातमागावर उत्तम प्रतीचे कापड तयार करीत आणि या कापडाला परदेशातून अनेक ठिकाणी मागणी असे – त्याची चांगली विक्री व्हायची. इंग्लंडमध्ये सुद्धा विकले जायचे. परंतु ब्रिटिशांना ते आवडले नाही.

तेव्हा त्यांनी असे एक फर्मान काढले, की कोणालाही भारतीय कापडाची कोणत्याही देशात निर्यात करावयाची असेल, तर त्यांनी अगोदर भरपूर पैसे मोजावेत आणि मगच त्यांना परवानगी मिळे हा एकप्रकारचा करच होता. त्याला निर्यात-कर असे म्हणू लागले. ब्रिटिशांची इच्छा अशी होती की भारताने फक्त कापूस उत्पन्न करावा. अतिशय कमी किंमतीत ब्रिटिशांनी विकत घेऊन तो इंग्लंडला रवाना करायचा. तिथे मशीनवर त्याचे कापड तयार होई. ते पुनः भारतात आणून भारतीयांना जास्त किंमतीला विकीत. याच कारणामुळे भारतीय लोकांनी इथे गिरण्या कारखाने उभारलेले त्यांना आवडत नसे. तेव्हा राजामहाराजांबरोबर शेतकरी मजूर-विणकर, व्यापारी भारतातील या सर्व मंडळींना खाली ओढण्यात ब्रिटिशांचा फार मोठा हात होता.



अशा या ब्रिटिश लोकांच्या विरुद्ध पहिला बंडाचा झेंडा १८५७ मध्ये उभारण्यात आला. म्हणजे प्लासीच्या लढाईनंतर बरोबर शंभर वर्षांनी ! ब्रिटिश कंपनीत जे भारतीय शिपाई नोकरीला होते त्यांना अतिशय वाईट वागणूक मिळे. त्यांना बढती मिळण्याची तर कधी आशाच नसे. या भारतीय शिपायांनी मीरतला प्रथम बंडाची सुरवात केली.




नंतर हळूहळ ते उत्तरेपासून म्हणजे पंजाबपासून ते दक्षिणेत नर्मदेपर्यंत पसरू लागले. पूर्वेला बिहारमध्ये तर पश्चिमेला राजपुतान्यात त्याचे लोण पसरले. शिपायांबरोबर हळूहळू त्यात इतरही लोक सामील होऊ लागले. सर्व जाती जमातीची मंडळी त्यात जबाबदारीने पुढाकार घेऊ लागली. शेवटचा मोंगल बादशहा बहादूरशहा याला सर्वांनी



नेतेपद बहाल केले. कानपूरमध्ये बंडाचे निशाण रोवणारे नानासाहेब त्यात होते. तात्या टोपे होते या टोप्यांनीच अत्यंत हुशारीने पाठशिवणीचा खेळ खेळल्यासारखे ब्रिटिशांना दोन वर्षे झुलवले होते. बिहारचे ऐंशी वर्षे वयाचे कनवरसिंग त्यात होते, तर अलाहाबादचे लियाकत अली पण होते. लियाकत अली हे साधे शाळामास्तर होते. इतकेच काय परंतु फैजाबादचे धर्मगुरू अहमदुल्ला शहा यांनीही बंडात फार मोठ्या हिकमतीने भाग घेऊन लोकांना मार्गदर्शन केले. या लढ्यात स्त्रियाही मागे राहिल्या नाहीत. झांशीची राणी लक्ष्मीबाई हिने तर शरणागती न पतकरता आपल्या प्राणांची आहुती या लढ्यात दिली. अवधची बेगम हजरतमहल ही सुद्धा आपल्या सैन्याला उत्तेजन देण्यासाठी म्हणून लखनौत ब्रिटिशांच्या विरुद्ध उभी ठाकली.

अत्यंत क्रूरपणे या बंडाचा बिमोड करण्यात आला. बहादुरशहाला ब्रह्मदेशात हद्दपार केले. तिथेच कैद करून ठेवले. त्याच्या मुलांना ठार मारले. शेकडो लोकांना तोफेच्या तोंडी बांधून गोळ्यांप्रमाणे उडवण्यात आले. अनेकांना फाशी दिले. अनेक खेडी जाळली. पण ब्रिटिशांना या बंडाची थोडी दहशत बसली हे खरे ! ब्रिटिशांनी ठरविले की आता केवळ कंपनीच्या हातात भारताचा कारभार देऊन उपयोगी नाही. ब्रिटिश सरकारने सर्व कारभार आपल्या ताब्यात घेतला. आणि भारतावर व्हाईसरॉयच्या मदतीने राज्य करण्यास सुरवात केली. व्हॉईसरॉय म्हणजे ब्रिटिश राजा अगर राणीचा प्रतिनिधी !


ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीच्या हातून कारभार काढून घेतला तरी. परिस्थितीत काही बदल झाला नाही. कंपनीच्या व्यापाऱ्यांच्या ऐवजी ब्रिटिश सरकारने नेमलेले अधिकारी त्या जागी आले. स्वतःला ज्या काही गोष्टी पाहिजे होत्या त्या हस्तगत करून घेण्यात ब्रिटिश लोक मोठे पटाईत होते. स्वतःच्या देशाचे आणि स्वतःचे



भले व्हावे एवढयाच एका उद्देशाने ब्रिटिशांनी राज्य चालवले. त्यांना असे वाटायचे की आपणच काय ते एक श्रेष्ठ लोक आहोत आणि भारतीय मात्र सगळे अगदी हलके. आपणही राज्य करू शकतो, असा विचारदेखील भारतीय लोकांनी करू नये, असे ब्रिटिशांना वाटायचे. अशा रीतीचा विचार दडपून टाकण्यासाठी त्यांनी अत्यंत क्रूर आणि दुष्ट उपाययोजना अंमलात आणल्या. भारतीय लोकांना दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी जेवढा जोराचा प्रयत्न केला; तेवढयाच जोराने भारतीयांनीदेखील स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. ही स्वतंत्र होण्याची आकांक्षा साऱ्या भारतीय जनतेकडून व्यक्त होत होती. प्रत्येकाचे मार्ग मात्र भिन्न होते.

राजा राममोहन रॉयसारख्या सुधारकांना वाटत होते की, आपल्याला जर स्वातंत्र्य पाहिजे असेल, तर ते मिळवण्यासाठी आपण लायक बनले पाहिजे. भारतीय लोकांनी आपल्या जुन्या चालीरीती व दुष्ट रूढी सोडून दिल्या पाहिजेत, असे त्यांना वाटायचे. प्रत्येकाने शिक्षण घ्यावे, विशेषतः स्त्रियांनी सुशिक्षित व्हावे, असे ते म्हणत. विवेकानंदांनीही असेच विचार व्यक्त केले. त्यांनी तर असे विचार व्यक्त केले की, आपल्याच बांधवांना वाईट वागणूक देऊन, भारतीय लोकांनी मोठे पाप केले आहे. भारतीय लोकांना वाटायचे की, आपणच फार मोठे धार्मिक आहोत. पण विवेकानंदांनी सांगितले की, जोपर्यंत आपण धैर्यशील व सामर्थ्यवान बनत नाहीत; तोपर्यंत आपल्याला धार्मिक म्हणवून घेता येणार नाही.

अनेक लेखकांनी नाटके, कादंबऱ्या, कविता, गाणी लिहिली आणि त्यातून ब्रिटिशांच्या दडपशाहीचा निषेध केला. सन १८६० साली दीनबंधू मित्र यांनी नीलदर्पण नावाचे एक नाटक बंगाली भाषेत लिहिले. या नाटकाचा ब्रिटिशांना फारच राग आला. कारण त्यात शेतकऱ्यांनी नीळ पिकवावी म्हणून ब्रिटिशांनी केलेल्या जुलुमाचे वर्णन होते.



त्या काळांतले बंगाली कादंबरीकार बंकीमचंद्र यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीतले 'वंदे मातरम्' हे गीत आपल्याला सगळ्यांना चांगलेच माहित आहे. टागोरांचे 'जन गण मन' हे तर आपले राष्ट्रगीतच झाले. राष्ट्रीय एकात्मतेवर ते गीत आधारलेले आहे. सुब्रह्मण्यम् भारती यांनी अशीच देशभक्तीपर गीते तमीळ भाषेत लिहून तिथल्या लोकांना स्फूर्ती दिली.

भारतीय भाषेतील वर्तमानपत्रांनी तर आपल्या वर्तमानपत्रांतून ब्रिटिशांवर इतकी झोड उठवली की शेवटी १८७८ मध्ये ब्रिटिशांनी असा एक हुकूम काढला की, यापुढे भारतीय भाषेत कोणतेही वर्तमानपत्र काढता येणार नाही. काही वर्षांनी तो हुकूम मागे घेतला. पण वर्तमानपत्रांत त्यांच्याविरुद्ध काही मजकूर आल्यास त्या वर्तमानपत्राच्या संपादकांना ते कडक शिक्षा करीत. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी आपल्या वर्तमानपत्रांत ब्रिटिश न्यायाधीश कसे चुकीचे, अन्याय्य निर्णय देतात याचे वर्णन केले, तर यासाठी त्यांना तुरुंगवास पतकरावा लागला.





जसजसा काळ जाऊ लागला, वर्षामागून वर्षे गेली, तसे अनेक लोक अनेक मार्गांनी या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊ लागले. लढा तीव्र होऊ लागला.

या राजकीय चळवळीमुळे लोकांना एकत्रित येण्याची संधी मिळाली. त्यातूनच पुढे १८८५ साली 'इंडियन नॅशनल काँग्रेस'चा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. त्याची पहिली सभा मुंबईत झाली. भारतातील सर्व प्रांतातून लोक आले. या सभेला केवळ हिंदूच नव्हे, तर. सयानी, तैय्यबी सारखे मुसलमान, दादाभाई नौरोजी आणि फिरोजशहा मेहतासारखे पार्शी वगैरे मंडळी पण हजर होती. ही सर्व मंडळी भारतीय काँग्रेसची सभासद झाली आणि स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी सक्रीय भाग घेतला. ही चळवळ फोफावल्यावर गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी वगैरे मंडळी त्यांत सामील झाली व त्यांनी लोकांना शिक्षण देण्यास सुरवात केली. सुरवाती सुरवातीला म्हणजे १९०५ पर्यंत या काँग्रेसने ब्रिटिशांना काही आव्हान दिले नाही. ब्रिटिशांच्या राज्यात लोकांना काय दु:ख, दैन्यावस्था भोगावी लागते याची जाणीव करून देऊन त्यात सुधारणा कशा करायच्या, याचा ही मंडळी विचार करू लागली. त्यामुळे काही लोकांना असे वाटू लागले, की हे काँग्रेसचे पुढारी म्हणजे मवाळ लोक आहेत. त्यांची ही कल्पना चुकीची होती. काँग्रेसच्या लोकांना असे वाटत होते की ब्रिटिशांच्या वागणुकीत वदल होईल. त्यांनी उघडपणे ब्रिटिशांना त्यांच्या चुका दाखवण्यास सुरुवात केली. त्यांच्या पहिल्याच सभेमध्ये अनेक श्रेष्ठींनी वृत्तपत्रांची कशी गळचेपी चालवली आहे, हे उघडपणे बोलून दाखवले. काही लोकांनी ब्रिटिश सरकार दुष्काळासाठी प्रतिबंधक उपाय योजत नाहीत, याबद्दल संताप व्यक्त केला. दुष्काळ वारंवार पडत होता; त्यात अनेक लोक मृत्युमुखी पडत होते. पोलिस यंत्रणेवर होणारा खर्च कमी करून तो पैसा जास्तीत जास्त शाळा व हॉस्पिटले चालवण्यात उपयोगी आणावा, असे काहींनी सुचविले. म्युनिसिपालिटीत सरकार सभासदांची नेमणूक करते; त्याऐवजी लोकांनी निवडलेल्या सभासदांना कौन्सिलवर घ्यावे, असाही एक विचार सभेत मांडला. तसेच सरकार खेरीज इतर कुठल्याही यंत्रणेने भारतातील लोकांकडून किती मोठ्या प्रमाणावर अबकारी कर गोळा केला जातो व त्याचा खर्च कसा होतो हे पाहण्याची मागणी केली. ब्रिटिश लोक आपल्या लोकांचा पैसा कसा लुटताहेत व देश कसा दरिद्री–गरीब होत चालला आहे हे दादाभाई नौरोजींनी निदर्शनास आणून दिले. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांची भाषणे व लेख वाचून भारतातीलच काय पण इंग्लंडमधील लोकांना पण समजले की ब्रिटिश लोक भारताचा कसा नायनाट करीत आहेत.

१९०५ नंतर काँग्रेसच्या पुढाऱ्यांतच कोणत्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवावे या बाबत मतभेद झाले. टिळक, बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय यांना वाटत होते की ब्रिटिश लोक अशा मवाळपणे ऐकणार नाहीत. तेव्हा जहाल मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

टिळकांनी ' केसरी ' या मराठी वर्तमानपत्रातून लिहिण्यास सुरवात केली. १८९७ साली दुष्काळ पडला, तेव्हा शेतकऱ्यांनी शेतसारा कर भरू नये म्हणून त्यांना चिथवले. तेव्हा ब्रिटिशांनी टिळकांना तुरुंगात टाकले. १८ महिने त्यांना तुरुंगात खितपत पडावे लागले. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' हे घोषवाक्य प्रथम त्यांनीच उच्चारले. स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य. मवाळ लोकांना जहाल लोकांचा हा मार्ग पसंत नव्हता.

या शतकाच्या सुरवातीला भारतीय स्वातंत्र्याची चळवळ जोम धरू लागली. सुशिक्षित लोकांची खात्री पटली की, ब्रिटिश सरकारने भारताचे अगर भारतीय लोकांचे काहीही कल्याण केलेले नाही.

त्याच वेळी लॉर्ड कर्झन हा भारताचा व्हॉइसरॉय झाला. तो अत्यंत अभिमानी व घमेंडखोर होता. भारतीय लोक हे इतरांप्रमाणे स्वतः आपल्या देशाचे राज्य चालवू शकतील हे त्याला पटतच नव्हते. त्यांनी अनेक प्रकारांनी काँग्रेस व काँग्रेसची चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. बंगालमधल्या हिंदु आणि मुसलमान यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. एका प्रांतात ते गुण्यागोविंदाने राहात होते, हे त्याला पाहवत नव्हते. त्यामुळे त्याने बंगालसारख्या मोठ्या प्रांताचे दोन भाग केले. त्यालाच बंगालची फाळणी म्हणतात. जेव्हा सरकारने ही फाळणी केली, तेव्हा बंगाल मधल्याच काय पण इतर प्रांतातल्या लोकांनी त्याचा धिक्कार केला. सरकारला बजावले की फाळणीला सर्वांचा विरोध आहे. ब्रिटिशांनी लोकात फूट पाडून त्यांना कमजोर कमकुवत करण्याचा हा डाव टाकला. परंतु त्याचा परिणाम अगदी उलट झाला. लोक उलट एकत्रित येऊन जास्त शक्तिमान झाले. लाला लजपतराय, टिळक–अरविंद घोष, बिपीनचंद्र पाल वगैरे या चळवळीचे आद्य पुढारी म्हणून ओळखले जाऊ लागले. लाला लजपतराय आणि बिपीनचंद्र पाल यांनीच वास्तविक पाहता या चळवळीला सुरवात केली. लोकांनी बंड करून हे सरकार उलथवून टाकावे, अशी या दोघांची इच्छा होती. शेवटी १९०७ साली ब्रिटिशांनी लजपत राय यांना पकडले व त्यांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी केली.

लोकांचा इतका विरोध असूनही ब्रिटिशांनी फाळणी केलीच. ब्रिटिशांनी बळाचा वापर करून सर्व विरोध दडपून टाकला. परंतु हे इथेच थांबले नाही. चळवळ सुरूच राहिली आणि चार वर्षांनंतर बंगालची फाळणी रद्द झाली.

अनेकांना असे वाटू लागले की हिंसात्मक चळवळीला हिंसात्मक रीतीनेच उत्तर दिले पाहिजे. आणि यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नव्हते. तेव्हा काही क्रान्तिकारक मंडळींनी हिंसात्मक चळवळ सुरू केली आणि काही ब्रिटिश अधिकाऱ्यांचा त्यांनी खून केला.

खुदीराम बोस या पंधरा वर्षे वयाच्या कोवळ्या पोराने १९०८ साली असा खून करण्याचा प्रयत्न केला. त्याला त्यासाठी फासावर लटकावे लागले. काही क्रान्तिकारी

लपूनछपून बॉम्ब व इतर हत्यारे तयार करू लागले. कलकत्यात माणकतल्लामध्ये अशा काही लोकांची टोळी पकडली आणि त्याच्यावर कट करण्याचा आरोप ठेवला

ही क्रान्तिकारी चळवळ खूप जोरदार झाली नाही, तरी ती अनेक वर्षे चालू राहिली. क्रांतीवीर संख्येने थोडेच होते. पण फार शूर होते. लोक जरी त्यांच्या चळवळीत सामील झाले नाहीत, तरी लोक त्यांच्या शौर्याचे व त्यागाचे कौतुक करीत होते. भगतसिंग नाव आपण ऐकलेच आहे. भगतसिंग व त्याचे साथीदार सुखदेव व राजगुरु यांनी आपल्या मर्दुमकीने पंजावच्या लोकांना चिथवले. त्यांना शेवटी फाशीची शिक्षा झाली.

काही भारतीय परदेशात गेले व परदेशातून त्यांनो चळवळीसाठी कार्य केले. युरोप व अमेरिकेतील लोकांना ते पटवू लागले की ब्रिटिशांचा अंमल हा आम्हा लोकांना किती जाचक आहे. भारत स्वतंत्र करण्यासाठी ते त्यांची मदत घेऊ लागले. अशा लोकांपैकीच मादाम कामा या एक होत. त्यांनी १९०९ पासून जिनिव्हामधून ‘वंदे मातरम्’ नावाचे एक पत्र काढायला सुरवात केली. वीरेंद्रनाथ चटोपाध्याय यांनी ‘इंडियन इंडिपेडन्स कमिटी’ (भारतीय स्वातंत्र्य समिति) नावाची एक संस्था वर्लीनमध्ये काढली. राजा महेंद्रप्रताप, मोहन वरकतुला आणि मौलाना ओबिदुल्ला हे काबुलला गेले आणि त्यांनी एक तात्पुरते सरकार स्थापन केले.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या पंजाब्यांनी ‘गदर’ पक्षाची स्थापना केली. गदर म्हणजे बंड किंवा बंडाळी ! आणि तिथून त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीला मदत करण्याचा प्रयत्न केला. सावरकर आणि जतीन मुखर्जी यांनी पिस्तुले आणि बंदूका जमवायला सुरवात केली. या सर्व गोष्टी पहिल्या महायुद्धाच्या वेळी म्हणजे १९१४ ते १८ च्या दरम्यान घडल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी, म्हणजे साधारण १९३९ ते १९४५ मध्ये नेताजी सुभाष बोस यांना तुरुंगात टाकले. ते १९४१ च्या सुमारास तुरुंगातून पळाले. ते प्रथम जर्मनीला गेले आणि तिथून त्यांनी जपानला पोवारा केला. भारतीय सैन्याला ब्रिटिशांनी ब्रह्मदेश, मलाया आणि सिंगापूर इकडे लढाईसाठी पाठवले होते. परंतु जपानने जेव्हा हे देश पादाक्रांत केले, तेव्हा नेताजींनी याच भारतीय सैन्याच्या मदतीने ‘इंडियन नॅशनल आर्मी’ (भारतीय राष्ट्रीय सैन्य) याची स्थापना केली. हे सैनिक ब्रिटिशांनी तिथेच सोडून दिलेले किंवा जपान्यांनी आपल्या ताब्यात घेतलेल्यांपैकी होते. सैन्याच्या जोरावर आपण भारत स्वतंत्र करू, अशी सुभाषचंद्र बोसांना आशा होती. परंतु एकदमच युद्ध थांवले आणि सुभाषचंद्रांचा मृत्यू ओढवला. त्यामुळे सर्व बेत फसला.

आपण पुनः आपल्या पहिल्या मुद्यावर येऊ. बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटिशांना एकंदर परिस्थिति जड जाऊ लागली. वळजवरीने आपण काही करू शकत नाही हे त्यांना पटले. लोक जास्तीत जास्त असंतुष्ट होत होते. त्यामुळे चीड वाटत होती. तेव्हा ब्रिटिशांनी ठरवले की लोकांना थोडे स्वातंत्र्य वहाल करायचे आणि त्यासाठी त्यांनी



काही बदल केले.

त्यावेळी इंग्लंडमध्ये त्यांच्या सरकारात जॉन मोर्ले हा भारतासाठी नेमलेला सेक्रेटरी होता. तर भारतात मिंटो हा व्हाइसरॉय होता. त्यामुळे जो काही दोघांच्या मताने बदल झाला, त्याला १९०९ सालच्या मोर्ले मिंटो सुधारणा म्हणू लागले. या सुधारणेमुळे विधिमंडळात भारतीय लोकांना जास्त प्रमाणात प्रवेश मिळाला. लोकांकडून निवडलेले गेलेले मात्र फार थोडे होते. कित्येक गोष्टींवर चर्चा करण्यास मनाई करण्यात आली. सरकार आपल्या मर्जीप्रमाणे कारभार करू लागले. या सुधारणांमुळे एक गोष्ट मात्र फारच घातक ठरली. ती म्हणजे हिंदु आणि मुसलमान यांना वेगळे गणले जाऊ लागले. मुसलमानांसाठी मध्यवर्ती विधानमंडळावर राखीव जागा ठेवण्यात येऊ लागल्या आणि याचे मतदारही फक्त मुसलमानच. ब्रिटिशांनी जाणूनबुजून हा डाव टाकला. त्यांना आपल्या लोकात दुफळी पाडायची होती. त्यामुळे भारतीय लोक कमजोर होऊन ब्रिटिशांना त्यांच्यावर हुकमत गाजवता आली असती. त्यांनी ज्या सुधारणा सुचवल्या होत्या; त्या इतक्या निराशाजनक होत्या की नेमस्त मंडळी ज्यांचा ब्रिटिशांच्या प्रामाणिकपणावर विश्वास होता, त्यांनाही ब्रिटिशांनी चकविले. त्यामुळे हळूहळू नाराज आणि बंडखोर लोकांची संख्या वाढू लागली.

१९१४ साली युरोपमध्ये युद्धाला तोंड फुटले. ब्रिटिशांना जुलूम करण्यासाठी हे आणखी एक कारण मिळाले. युद्धकाळात लोकस्वातंत्र्यापेक्षा राष्ट्राची सुरक्षितता ही जास्त महत्वाची असते; असे त्यांनी लोकांना सांगायला सुरवात केली. जर शत्रूचा जय झाला तर सारेच स्वातंत्र्य नष्ट होईल असे ते म्हणू लागले.

एक भारतीय गृहस्थ वकील होण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला गेले होते ते याच सुमारास म्हणजे युद्ध चालू असताना १९१५ साली भारतात परत आले. सुदैवाने तीस वर्षे आपल्या भारतीय लोकांचे ते एकमेव मार्गदर्शक झाले. स्वातंत्र्यासाठी लढण्याचा त्यांनी एक निराळाच मार्ग शोधून काढला. असा मार्ग की जो आजपर्यंत कोणालाच सुचला नव्हता. हा मार्ग दाखवणारे महान् नेते म्हणजेच गांधीजी !

अत्यंत प्रेमळ माणूस ! त्यांना लोकांबद्दल अपार माया होती. खूप प्रेम होते. त्यांनी आपल्या शत्रूंवर देखील प्रेम केले. ते अत्यंत हुषार होते. सर्वात महत्वाचे म्हणजे ते सच्च्या दिलाचे गृहस्थ होते. आपण ही चळवळ का करीत आहोत, याचा लोकांनी पुन: पुन: विचार करावा, असे त्यांनी सांगितले. ही चळवळ वरोबर आहे की नाही, हे जर लोकांना स्पष्टपणे उमगले नाही, तर ते भलतेच काहीतरी करून बसतील चुकीच्या मार्गाने जातील. आणि जे सोडण्यासाठी म्हणून ते धडपड करताहेत त्यातच कदाचित ते पुन: अडकतील.

पण लोकांना ते उमगले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की आपल्या राष्ट्राच्या

हितासाठी ते एकत्रित होत आहेत. लढत आहेत. तेव्हा परकीयांना त्यांच्यावर सत्ता गाजवण्याचा काही अधिकार नाही. हे जर खरं आहे तर हिंदू आणि मुसलमान यांनी आपापसात का झगडावे ? असा सवाल गांधींनी लोकांना केला. उच्चवर्णीय हिंदूसुद्धा आपल्या हरिजन–अस्पृश्य बांधवांना वाळीत का टाकतात ? त्यांना अस्पृश्य का मानायचे ? गांधींनी हिंदू आणि मुसलमान यांना एकत्र आणण्यासाठी हरिजनांची स्थिती सुधारण्यासाठी आपले सर्व आयुष्य वेचले.

मागे सांगितल्याप्रमाणे ब्रिटिश नीळ उत्पादक आपल्या शेतमजूरांवर व गिरणीमालक आपल्या कामगारांवर जुलूम करीत. गांधीजींच्या हे लक्षात आले. १९१८ साली ते बिहारमधे चंपारण्याला गेले आणि या शेतमजूरांवर होणाऱ्या अन्यायासाठी खूप झगडले. १९१८ सालीच त्यांनी अहमदाबादला मिल मजुरांचा संप घडवून आणला. मिल मजुरांना वेतन वाढवून मिळावे, यासाठी त्यांनी उपोषण सुरू केले. ब्रिटिश लोक आज नाहीतर उद्या जातील. पण आपले भारतीय जुलमी जमीनमालक आणि गिरणीमालक यांचे काय ? गांधीजींनी लोकांच्या हे निदर्शनास आणून दिले की हे मालक पण जुलमी आहेत. ह्यांचे हृदय परिवर्तन करणे, हे स्वातंत्र्यप्राप्ती इतकेच महत्वाचे आहे. हे जमीनदार व गिरणीमालक ब्रिटिशांइतकेच आपल्या मजुरांना छळत होते. आपल्याच बांधवांची पिळवणूक करीत होते. तेव्हा गांधींनी या लोकांना समजावून सांगितले की हे श्रीमंतांनो, तुमचा पैसा – तुमची श्रीमंती हा राष्ट्राच्या कल्याणासाठी जमवलेला निधी आहे.

यासाठी पहिले काम हाती घ्यायचे म्हणजे परकीय सत्ता नष्ट करायची. लोकांना गांधीजींची ही विचारसरणी समजायला थोडी जड गेली. हिंसा किंवा बळजबरी यांनी काही प्रश्न सुटत नाहीत. उलट याला आपण नेहमी विरोध केला पाहिजे. जर बळजबरी करणाऱ्याचा तुम्ही द्वेष करू लागलात आणि त्याच्याविरुद्ध शक्तीचा वापर केलात तर त्याला आपल्या कृत्याचा बिलकूल पश्चाताप होणार नाही. ‘ शठं प्रति शाठ्यं ’ या न्यायाने तो अधिकच बळजबरी करील. माणूस हा मुळात वाईट प्रवृत्तीचा असतो यावर गांधीजींचा विश्वास नव्हता. तो सुधारू शकतो असे ते मानत. त्यांच्या हे लक्षात आले की ब्रिटिशांच्या अन्याय वागणूकीवर जर आपण इतके कटू होऊ शकतो, चिडतो तर आपली मंडळी जी आपल्याच बांधवावर अन्याय करतात त्यांच्यावरही चिडायला पाहिजे.

पुढे पुढे गांधीजींची ही शिकवण लोकांना पटू लागली. लोक त्यांना मानू लागले. त्यांचे अनुयायी होऊ लागले. गांधीजींकडे प्रथम आकर्षिले गेले ते राजेंद्रप्रसाद. ते पाटण्यातील एक अत्यंत हुषार, यशस्वी तरुण असे वकील होते. गांधीजी जेव्हा बिहारमध्ये चंपारणात गेले होते, तेव्हा राजेंद्रबाबु त्यांच्याबरोबर गेले होते.

नंतर हळूहळू मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, मोतिलाल नेहरू आणि त्यांचे चिरंजीव जवाहरलाल नेहरू गांधीजींना सामील झाले.





हिंसाचाराच्या मार्गानेच स्वातंत्र्य मिळू शकते, ही कल्पना गांधीजींना मान्य नव्हती. लोकांना जास्तीत जास्त अधिकार मिळवून देण्यासाठी ब्रिटिशांकडे भीक मागावी, याचना करावी, अशी त्यांची इच्छा नव्हती. त्यांची लढ्याची कल्पना अगदीच वेगळी होती. आणि क्रांतीकारपेक्षा यांच्या लढ्याला जास्त धैर्याची जरूरी होती. गांधीजी अन्याय झाला, तरच कायदेभंग करीत असत. त्या त्या कायदेभंगासाठी मिळणारी शिक्षा ते टाळीत नसत जर त्यासाठी ब्रिटिशांनी त्यांना मारहाण केली किंवा तुरुंगात टाकले, तर ते शिक्षा आनंदाने भोगत असत. किंबहूना यापेक्षा जास्त महत्वाचे म्हणजे त्यामुळे ते ब्रिटिशांचा द्वेष करत नसत, हीच गांधीजींची सत्याग्रहाची एक पद्धत होती. आफ्रिकेत जेव्हा गांधीजी होते, तेव्हा गोरे अधिकारी भारतीय मजूरांना क्रूरपणे वागवीत. त्यावेळी गांधीजींनी याच पद्धतीचा उपयोग केला होता. भारतात परत आल्या नंतर गांधीजींनी शांतपणे संयमाने याची शिकवण आपल्या लोकांना-द्यायला सुरवात केली. लोकांचा द्वेष न करता, त्यांना त्रास न देता त्यांना जिंकावे कसे याचे धडे ते लोकांना देत. पुढे तीस वर्षे याच आगळ्या पद्धतीने त्यांनी लढा दिला. त्यांच्या अनुयायांची संख्या दिवसानुदिवस वाढू लागली. लोक त्यांच्या पाठीमागे स्वखुषीने जाऊ लागले.

सुरवातीला अशा लढ्यात गांधीजींनी हिंसाचारापासून कसे अलिप्त रहावे हे निश्चितपणे दाखवून दिले होते. पहिल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटिशांनी भारतीयांना देऊ केलेले काही हक्क–अधिकार काढून घेतले. नुसत्या संशयावरून त्यांनी लोकांना पकडून शिक्षा ठोठावल्या. कोणी स्पष्टपणे लिहू किंवा बोलू शकत नव्हते. १९१७ साली ब्रिटिशांनी काही सुधारणा जाहीर केल्या. त्यांनाच 'मोंटेग्यू–चेम्सफोर्ड' सुधारणा असे म्हणू लागले. त्यांनी भारतीयांना पोकळ वचने दिली की तुम्हाला जास्त अधिकार देण्यात येतील पण त्यासाठी तुम्ही योग्य ठरलात तर !

परंतु युद्ध जेव्हा संपले तेव्हा लढाईच्या काळातील आणीबाणीचे हे हुकूम काढण्याऐवजी त्यांनी कायदा पास करून ते चालूच ठेवले. त्याच्या निषेधार्थ भारतात अनेक ठिकाणी सभा झाल्या. १३ एप्रिल १९१९ साली अमृतसरमध्ये जालियनवालाबाग या ठिकाणी अशीच एक सभा झाली.

३० हजाराहून अधिक असे स्त्री–पुरुष मुले–म्हातारी–सर्व मंडळी

आपले नेते या कायद्याविरुद्ध काय सांगताहेत हे ऐकण्यासाठी जमली होती. जनरल डायर हा ब्रिटिश अधिकारी या लोकांना धडा शिकवण्यासाठी म्हणून आपले शिपाई घेऊन तिथे हजर झाला आणि कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांनी अमानुषपणे त्या जमावावर गोळीबार केला. हजारो लोक मृत्युमुखी पडले तर हजारो जखमी झाले. सर्व भारत या हत्याकांडाने हादरून गेला. परंतु गांधीजी या लढ्यात आपल्या विश्वासापासून जरा ढळले नाहीत. हिंसेचा प्रतिकार अहिंसेनेच केला पाहिजे असे अजून त्यांचे ठाम मत होते १९२२ साली गांधीजींनी गुजराथमधल्या बार्डोली या गावी लोकांच्या मदतीने शांततेने कायदेभंग करून सत्याग्रह करण्याचे ठरविले. सर्व जय्यत तयारी झाली पण बार्डोलीत सविनय कायदेभंगाची सुरवात होण्यापूर्वीच उत्तर प्रदेशातील चौरीचौरा या गावी हिंसात्मक चळवळीला सुरवात झाली. पोलिसांनी त्या लोकांवर गोळीबार केला. तर उलट त्या हिंसाचारी लोकांनी पोलिस स्टेशनला आग लावली. त्यात काही पोलिस मेले. गांधीजींनी बोर्डोलीचा सत्याग्रह ताबडतोब मागे घेतला. त्यामुळे त्यांचे खरे अनुयायी-देखील थोडेसे नाराज झाले. परंतु काही काळानंतर त्यांना उमगले की गांधीजी तत्त्वाच्या बाबतीत दृढनिश्चयी आहेत. त्यांची तत्त्वे फार श्रेष्ठ दर्जाची होती.

सहा वर्षानंतर पुनः बोर्डोलीचा सत्याग्रह झाला. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक महत्वाचा लढा म्हणून याची गणना होऊ लागली. १९२८ साली ब्रिटिशांनी बोर्डोलीत जमीन महसूल वाढवला. वल्लभभाई पटेल हे त्या काळी तिथले नामांकित वकील होते. ते धंद्यात निष्णात होते. पैसा भरपूर मिळवीत. गांधीजींनी जेव्हा वकिलांना आवाहन केले की ब्रिटिशांच्या कोर्टावर बहिष्कार घालावा. त्यावेळी वल्लभभाई पटेल यांनी तात्काळ वकिली बंद करून ते राष्ट्रीय चळवळीत सामील झाले आणि १९२८ साली त्यांनी बोर्डोलीत कर देऊ नये, म्हणून मोहिम उघडली. मुंबईच्या गव्हर्नरने सर्व शक्तीचा वापर करून ही मोहीम चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना कर देण्याचा हुकूम केला – आज्ञा केली. परंतु पटेलांनी सुरू केलेल्या या मोहिमेत ऐंशी हजार शेतकऱ्यांनी भाग घेतला आणि ब्रिटिशांच्या या दडपेगिरीचा प्रतिकार केला. शेवटी ब्रिटिशांना माघार घ्यावी लागली.

या लढ्यापासूनच वल्लभभाई पटेल हे सरदार पटेल म्हणून ओळखले जाऊ लागले आणि बोर्डोलीला स्वातंत्र्य लढ्यात आगळे स्थान प्राप्त झाले.

आपल्या लोकांना समानतेची वागणूक मिळावी या दृष्टीने आपल्या लोकांनी ब्रिटिशांना आणखी एक संधी देण्याचे ठरवले. सी. आर. दास आणि मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या स्वराज्य पक्षाने निवडणूकीत भाग घेऊन ब्रिटिशांशी सहकार्य करण्याचे ठरवले. खाली प्रांतातून विधिमंडळावर यायचे व वर मध्यवर्ती सरकारात असेंब्लीत यायचे. १९२६ साली स्वराज्य पक्षाच्या- लोकांनी मध्यवर्ती असेंब्लीतून

सभात्याग करून बाहेर निघायचे ठरवले. मोतीलाल नेहरूंनी त्याचे कारण असे सांगितले की आम्ही सहकार्य देण्यास तयार असताना तुम्ही ते नाकारता. तेव्हा आम्हाला आमचा हेतू साध्य करण्यासाठी निराळ्या मार्गाचा विचार करावाच लागेल.

या स्वातंत्र्याच्या दीर्घकालीन धुमश्चक्रीत अनेक महत्वपूर्ण लढे द्यावे लागले. जेव्हा भारतीयांनी निर्वाणीची सूचना दिली की, यापुढे आम्ही दीर्घकाल थांबू शकणार नाहीत. आमचा आम्ही राज्यकारभार पाहाण्यास सुरवात करू. तेव्हा ब्रिटिशांनी काहीतरी कारणे काढून ते लांबवण्यास सुरवात केली. त्यांचे म्हणणे असे होते की, तुम्ही लोक राज्य करण्यास लायक आहात की नाही, हे पाहाण्यासाठी आम्ही एक कमिशन नेमू. त्याप्रमाणे १९२८ साली सायमन कमिशन भारतात पाहणी करण्यासाठी आले. सर्व देशभर याचा निषेध झाला. अशाच एका निषेधार्थ भरलेल्या सभेत पोलिसांनी लाठीहल्ला केला, आणि त्यातूनच पुढे लाला लजपतराय यांचा मृत्यू ओढवला.

स्वराज्य प्राप्तीकरिता सबंध देशभर समर्थ अशी चळवळ उभी राहिली. १९२९ साली लाहोर येथे कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले. जवाहरलाल नेहरू यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि हे पुढारी काय करताहेत याची राष्ट्र जणू वाट बघू लागले. या ऐतिहासिक अधिवेशनात दृढ निश्चयाने जाहीर करण्यात आले, की पूर्ण स्वराज्य मिळाल्याखेरीज भारतातील लोक संतुष्ट होणार नाहीत. आता ब्रिटिशांच्या अधिक सुधारणा वगैरे नकोत. पायरी पायरीने मिळणारे स्वातंत्र्य नको. २६ जानेवारी १९३० रोजी भारतीय लोकांनी स्वातंत्र्यासाठी निकराने – जिद्दीने लढण्याची शपथ घेतली. लाहोरच्या अधिवेशनात दुसरा सत्याग्रह सुरू करण्याचे ठरवले. ही चळवळ प्रचंड प्रमाणात उभी राहाणार व महात्मा गांधी हेच त्याचे एकमेव नेते राहणार असे ठरले. ते सांगतील ती आज्ञा पाळायची आणि सर्वांनी अनुयायी म्हणून त्यांच्या पाठीमागे राहायचे त्यांना सहाय्य करायचे.

गांधीजींनी दीर्घकाल यावर विचार केला. आणि नवीनच कायदेभंगाचा आणि सत्याग्रहाचा मार्ग शोधला.

ब्रिटिश लोक इथला कच्चा माल कमी किंमतीत खरेदी करून आपल्या जहाजावर शिगोशिग भरून ती जहाजे इंग्लंडला रवाना करीत. त्या कच्च्या मालाच्या मशीनवर तिकडे वस्तु तयार करून त्या पुन: भारतात विकण्यास आणत. तसेच त्या परत येणाऱ्या जहाजातून भारतात जे त्यांचे कारखाने होते त्यासाठी लागणारी मशिनरी पण ते आणत. इतके सामान भरूनही जहाजे पूर्ण भरली जायची नाहीत. जहाज संथपणे चालण्यासाठी त्याच्यावर ठराविक वजनाचा माल भरावाच लागे. नाहीतर ती जहाजे डगमगत. तेव्हा ठराविक वजन पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश लोक त्यात तिकडचे मीठ भरत आणि ते आयात केलेले मीठ इथल्या लोकांना जास्त किंमतीला घ्यायला लावत. त्यासाठी दुसरे कुठलेही

मीठ तयार करायचे नाही असा हुकूम काढला. परंतु भारताच्या ऐसपैस पसरलेल्या समुद्र किनाऱ्यावर कोणीहि सहज मीठ तयार करू शकत असे. या मीठाची किंमत ब्रिटिशांनी तिकडून आणलेल्या मीठापेक्षा वीसपटीने कमी असे. गांधीजी हे साध्या विषयातून नेहमी मोठा आशय काढत असत. १९३० साली त्यांनी सर्व देशभर एक मोठा सत्याग्रह सुरू केला. समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्यासंबंधी जो कायदा ब्रिटिशांनी केला होता, तो मोडण्याची गांधीजींनी सर्वांना आज्ञा दिली. या कायद्याचा भंग करण्यासाठी गांधीजी गुजराथमधल्या दांडी या गावच्या समुद्रकिनाऱ्यावर मीठ तयार करण्यासाठी गेले. त्यांना तिथे अटक करण्यात आली. सर्व देशभर सत्याग्रहाने उग्र रूप धारण केले आणि हजारो स्त्रीपुरुष ब्रिटिश राज्य किती जुलमी आहे हे दाखवण्यासाठी शांततेच्या मार्गाने कायदा मोडू लागले.

ब्रिटिश लोक मशीनवर स्वस्त दरात तयार केलेल्या वस्तू आणून अनेक वर्षे इथे विकत होते. भारतीय पुढाऱ्यांच्या आता हे लक्षात आले की, यामुळे आपले अतोनात नुकसान होत आहे. आपले लघु उद्योग आणि हातमाग हे यामुळे नष्ट होतील आणि आपण






SMITH
CLOTH E

आपल्या मशीन्समध्ये–यंत्रामध्ये सुधारणा करून नवीन उद्योगधंदे चालवू शकणार नाही. आपला देश नुकसानीत जाऊन अधिकच दरिद्री होईल. तेव्हा या सर्व पुढाऱ्यांनी लोकांना आदेश दिला की, परकीय माल विकत घेऊ नका. स्वदेशी वस्तू वापरा. परकीय मालावर संपूर्ण बहिष्कार घाला. आपल्या देशात तयार झालेल्या, म्हणजे स्वदेशी वस्तू, अधिकाधिक विकत घ्या. भोलानाथ चंद्र, गोपाळराव देशमुख, महादेव गोविंद रानडे, राजनारायण बोस आणि टिळक या पुढाऱ्यांना याचे खरे महत्व कळले. बंगालच्या फाळणीच्या वेळी परकीय मालावर बहिष्कार – स्वदेशी वापरा – ही चळवळ फार लोकप्रिय झाली आणि हजारोंच्या संख्येने लोक या चळवळीत सामील झाले. गांधीजींनी स्वदेशीचे सूत्र पकडले आणि फार परिणामकारक रीत्या वापरले. ब्रिटिशांच्या वस्तू विशेषत: त्यांचे कापड वापरू नका, विकत घेऊ नका म्हणून गांधीजींनी आग्रह धरला. त्यांनी लोकांना चरख्यावर सूत काढायला सांगितले. हातमागावर खादी विणायला सांगितली. आपल्या देशात तयार झालेल्या वस्तूच आपण वापराव्या म्हणून त्यांनी लोकांना उपदेश केला. या ‘स्वदेशी’ चळवळीने घवघवीत यश संपादन केले. मिठाईवाल्यांनी परदेशी साखर वापरण्यास नकार दिला. धोब्यांनी परदेशी कपडे धुणार नाही म्हणून सांगितले. स्त्रियांनी कांचेच्या बांगड्या वापरण्याचे सोडून दिले. विद्यार्थ्यांनी परदेशी कागदावर बहिष्कार टाकला. भारतीयांनी आपल्याला लागणाऱ्या सर्व गरजेच्या वस्तू तयार करण्यास सुरवात केली. या लघुउद्योगात काडयापेटया, साबण, कागद, मातीची भांडी आणि चामडयाच्या



वस्तू सर्वांचा समावेश झाला. हळूहळू पुढे मोठमोठे कारखाने व गिरण्या उभ्या राहू लागल्या. त्यात कापड – पोलादी सामान आणि अनेक उपयुक्त वस्तू तयार होऊ लागल्या.

१९३५ साली ब्रिटिशांनी आणखी काही हक्क बहाल करण्याचे अमिष दाखवले. निवडणूकीत जास्त लोकांना मतदान करण्याचा अधिकार दिला. प्रांताप्रांतातून निवडून आलेल्या लोकांना आपल्या प्रांतात सरकार स्थापण्यास परवानगी दिली. परंतु बहुतांशी अधिकार त्यांच्या गव्हर्नरांकडे सोपवले. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जर एकादा कायदा पास केला, तर गव्हर्नरांना तो न आवडल्यास नाकारण्याचा अधिकार होता. ते आपल्या मनाप्रमाणे कायदा घडवायचे. काँग्रेसच्या लोकांना हे अजिबात आवडले नाही. त्यांनी पुनः प्रयत्न करून पाहायचे ठरवले. १९३७ साली निवडणूक जिंकून त्यांनी अनेक प्रांतातून काँग्रेसची सरकारे स्थापन केली. इतर प्रांतात निवडून आलेल्या प्रतिनिधींची मंत्री म्हणून निवड केली. परंतु १९३९ साली जेव्हा युद्ध सुरू झाले तेव्हा काँग्रेसच्या सरकारांनी राजिनामे दिले. याला दोन कारणे होती. एक म्हणजे आपल्या लोकांना विचारण्याची पर्वा न करता ब्रिटिशांनी जाहीर केले की भारतीय लोक हे जर्मन लोकां-बरोबर युद्ध करतील.

दुसरे कारण – जर्मनीने जे युरोपियन देश जिंकले ते त्यांना स्वतंत्र करावयाचे होते म्हणून ब्रिटिश लढत होते. तेव्हा आपल्या पुढाऱ्यांनी ब्रिटिशांना प्रश्न केला, की आम्हाला स्वातंत्र्य देऊनच तुम्ही याची सुरवात का करू नाही ?

१९४२ साली भारताच्या दृष्टीने युद्धाला धोक्याचे वळण लागले. तोपर्यंत ब्रिटिशांच्या विरुद्ध जपान युद्धात सामील झाला. ब्रिटिशांनी जपान्यांशी लढण्यासाठी आपले सैन्य भारतात ठेवले होते. त्यामुळे जपानने भारतावरच हल्ला करण्याची धमकी दिली. त्यामुळे काँग्रेसने हल्ल्याच्या संकटामुळे 'भारत छोडो' ही चळवळ सुरू केली. त्यांनी ब्रिटिशांना ताबडतोब निघून जाण्यास फर्मावले. अर्थात ब्रिटिश लोक इतक्या सहजासहजी कुठले ऐकायला ? त्यांनी ते काही केले नाही. उलट त्यांनी आपल्या या सर्व नेतेमंडळींना पकडून तुरुंगात टाकले. लोक फार चिडले–संतापले आणि सरकारबरोबर लढण्याचे अनेक मार्ग त्यांनी शोधून काढले. १८५७ प्रमाणेच ही चळवळ गाजली. ब्रिटिशांनी ही चळवळ निर्दयपणे दडपण्याचा प्रयत्न केला. हजारो लोकांना मारहाण केली तुरुंगात टाकले. तर कित्येक ठिकाणी गोळीबार करून लोकांना ठार मारले.

युद्ध समाप्तीनंतर ब्रिटनमध्ये मजूर पक्ष अधिकारावर आला. त्यांना कळून चुकले की भारतावर बळजबरीने राज्य करण्यात काही अर्थ नाही आणि करूही नये. गांधीजींनी ब्रिटिश लोकांना दाखवून दिले की ते लोक किती अन्याय्य वागणूक देत होते. ब्रिटिशांनी तिकडून एक शिष्टमंडळ पुढील वाटाघाटासाठी भारताला पाठवले.

गांधीजींच्या अनुयायांमध्ये अनेक मुस्लीम लोक होते. उदा. मौलाना आझाद, अब्दूल




गफार खान, हकीम अजमल खाँ आणि डॉ. झाकिर हुसेन. झाकिर हुसेन पुढे आपल्या भारताचे राष्ट्रपती झाले. सुरवातीला ब्रिटिशांनी हिंदू व मुसलमान यांना वेगळे ठेवून त्यांच्यात खूप भांडणे लावण्याचा प्रयत्न केला. १९०५ साली व्हाइसरॉय कर्झन याने मुसलमानांना वेगळे काढण्यासाठीच बंगालची फाळणी केली. बंगालच्या पूर्व भागात मुसलमानांची संख्या जास्त होती. तर पश्चिम भागात हिंदूंची संख्या जास्त होती. परंतु ही फाळणी जेव्हा केली, तेव्हा उलट दोन्ही जमाती एकत्रित झाल्या आणि त्यांनी फाळणीच्या विरुद्ध इतका जोराचा उठाव केला की १९११ साली ही फाळणी ब्रिटिशांना रद्द करावी लागली. मौलाना आझाद हे सच्चे मुसलमान होते. त्यांनी कुराणावर केलेले लिखाण वाचण्यासारखे आहे. त्यांचा असा दृढ विश्वास होता की खरा धर्म हाच की, ज्यांनी लोक विघटित न होता एकत्रित येतात. १९४० साली रामगढला जे काँग्रेसचे अधिवेशन झाले, त्याचे मौलाना आझाद अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या प्रभावी अशा अध्यक्षीय भाषणात सांगितले की आपली भाषा, आपले काव्य, आपले साहित्य, आपली संस्कृती, आपली कला, पोषाख, रीतीरिवाज प्रत्येक गोष्ट दाखवते की, हिंदू–मुसलमानांचे जीवन एकरूप आहे. हे सर्व घडवण्याचे हिंदू–मुसलमानांचे एकत्रित परिश्रम आहेत. आपण वेगळे नाही. हजारो वर्षे आपण एकत्र राहात आहोत. त्यांनीच आपले समान राष्ट्रीयत्व घडवले आहे. परंतु मुस्लीम लीगचे जे नेते होते, महमद अली जीना, ते असा दावा करीत की हिंदू आणि मुसलमान ह्या दोन वेगळ्या जाती आहेत. वेगळे समाज आहेत. त्या प्रत्येकाला आपापला स्वतंत्र देश हवा. त्यांना भारताची फाळणी हवी होती. आपल्या नेत्यांना त्याचे अतिशय दुःख झाले. त्यांना ते अजिबात आवडले नाही. परंतु मुस्लीम लीगची आक्रमक वृत्ती बघून त्यांनी ते शेवटी मान्य केले आणि पाकिस्तान भारतापासून वेगळे झाले.

१९२९ च्या डिसेंबरमध्ये लाहोरला जे काँग्रेसचे अधिवेशन झाले, त्यात आपल्या अध्यक्षीय भाषणात नेहरूंनी सांगितले की पूर्ण स्वराज्य हे आमचे ध्येय आणि त्याप्रमाणे या अधिवेशनात पूर्ण स्वराज्याचा ठराव पास करून घेतला. नवीन भारत निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न पुरे करण्यासाठी त्यांच्या कल्पना तुम्ही समजावून घेतल्या पाहिजे. स्वातंत्र्य याचा अर्थ दुसऱ्याच्या नजरेतून जगाकडे न पाहता स्वतःच्या दृष्टिकोनातून जगाचा विचार करणे. उदा. युरोपियन लोकांनी लिहिलेले इतिहासावरचे ग्रंथच आशियातले लोक यापूर्वी वाचत होते. युरोपियन लेखकांच्या दृष्टीने जगाचा इतिहास म्हणजे युरोपचा इतिहास होता. जगाच्या इतर कोणत्याहि भागात काही महत्वाचे घडले नाही अशा दृष्टीनेच ते ग्रंथ लिहिले होते. हा दृष्टिकोन किती चुकीचा होता, हे जवाहरलाल यांच्या 'जगाच्या इतिहासाचे ओझरते दर्शन' (Glimpses of World History) या ग्रंथात दाखवून दिले आहे. आज पंतप्रधान असलेल्या आपल्या कन्येसाठी त्यांनी हा

ग्रंथ लिहिला होता. हा ग्रंथ सर्व मुलांसाठीच जणू लिहिला आहे. या ग्रंथापासून चिनी, जपानी, इस्लामी आणि भारतीय संस्कृतीची महान कामगिरी तुम्हाला माहित होईल. जवाहरलालांच्या दृष्टीने स्वातंत्र्य याचा अर्थ इतरांच्या तुमच्याविषयीच्या कल्पना तुम्ही डोळे झाकून मान्य करू नये एवढाच नव्हता, तर स्वातंत्र्य याचा अर्थ तुम्ही स्वत:बद्दलही अवास्तव कल्पना बाळगू नयेत असाही होता. त्यांनी पुन: पुन: असे म्हटले आहे की भारताचा भूतकाळ भव्य असला तरी भारतातल्या लोकांचा अनेक बाबतीत अध:पात झाला आहे. अनेक लोकभ्रम त्यांच्यात पसरलेले आहेत आणि कष्ट करण्याची सवय त्यांनी सोडली आहे. त्यांची अशी इच्छा होती की, भारताने अधिकाधिक वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा. कारण वैज्ञानिक शोधामुळे जीवन अधिक सुकर होईलच परंतु लोकांतील भ्रामक समजुती कमी कमी होत जातील. जगातील सर्व गुलाम राष्ट्रातील लोकांच्या स्वातंत्र्यासाठी भारताने लढावे अशी त्यांची धारणा होती. दारिद्र्य म्हणजे एक प्रकारची गुलामगिरी म्हणून आपल्या देशातील दरिद्री लोक खऱ्या अर्थाने स्वतंत्र करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री घटना समितीमध्ये जवाहरलाल नेहरू आणि इतर नेत्यांनी स्वतंत्र भारतासंबंधीच्या या सर्व कल्पना अमलात आणण्याचा निर्धार केला. नेहरू आपल्या ऐतिहासिक भाषणात म्हणाले, "इतिहासात असे क्षण क्वचितच येतात की आपण भूतकालातून आपण नवीन कालात प्रवेश करतो, जेव्हा एका युगाची अखेर होते आणि अनेक वर्षे दडपलेल्या राष्ट्राच्या आत्म्याची पुकार ऐकू येते, तेव्हा अशा या गंभीर क्षणी भारत, भारतातील जनता आणि मानवता याची सेवा करण्याची शपथ आपण घेतली तर ते योग्यच ठरणार आहे. अनेक प्रकारचे लोक, अनेक परंपरा आणि अनेक धर्मनिष्ठा असलेल्या आपल्या प्रचंड देशासाठी आपली घटना राबवायची आहे. आपल्या घटना समितीने प्रदीर्घ विचार करून आपली घटना तयार केली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद होते. ते पुढे आपले पहिले राष्ट्राध्यक्ष झाले. जातीय सलोख्यासाठी, १९३४ सालच्या बिहारमधील भयानक भूकंपाचे वळी ठरलेल्या लोकां-साठी मदत गोळा करण्याकरिता आणि चंपारण्यामधील शेतकऱ्यांच्या मागण्यांकरिता त्यांनी अनेक वर्षे गांधीजींबरोबर कार्य केले होते. घटनापरिषदेत अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेल्या पहिल्या भाषणात त्यांनी असे म्हटले होते की स्वतंत्र भारतासाठी घटना तयार करण्याची जबाबदारी आपल्याला पार पाडायची आहे. स्वतंत्र भारताची घटना अशी असली पाहिजे की या प्रचंड देशात राहणाऱ्या सर्व धर्म, सर्व समाज आणि सर्व घटकांचे ती समाधान करू शकेल. प्रत्येकाला धर्मस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य, उपासना स्वातंत्र्य याची हमी देईल; प्रत्येकाला अत्युच्च पदावर पोचण्याची संधी देईल आणि प्रत्येकाला सर्व बाबतीत स्वातंत्र्याची हमी देईल.



डिसेंबर १९२९ च्या लाहोर काँग्रेसनंतर भारतातल्या सर्व लोकांनी २६ जानेवारी १९३० हा दिवस पूर्ण स्वराज्याची शपथ घेऊन स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला आणि वीस वर्षानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारतात सार्वभौम लोकशाही गणराज्याची स्थापना झाली.



Printed at Impress Offset E 17, Sector 7, NOIDA-201301



रु. 13.00 ISBN 81-237-3373-3

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया